प्रेस नोट ११ दिनांक ०३/१०/२०२५

-----------------------

# ट्रॉम्बे पोलीसांनी १,६०,०००/-रू किमतीचा ८ किलो १७६ ग्रॅम गांजा हस्तगत केलेबाबत...

परिमंडळ ६ अधिनस्त ट्रॉम्बे पोलीस ठाणे हद्दीत देवी विसर्जन बंदोबस्त दरम्यान महाराष्ट्र नगर, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या समोर पोह पवार, पोशि कोकरे व एमएसएफ जवान होळंबे यांस एक संशयास्पद वाहन दिसून आले. वाहनास बाजूला घेवून त्याची तपासणी करीत असताना सदर वाहनाचा चालक हा त्याचे ताब्यातील एक बॅग लपवित असल्याचे दिसून आल्याने बॅगची तपासणी केली असता बॅगमध्ये १,६०,०००/- रू. किमतीचा ८ किलो, १७६ ग्रॅम वजनाचा गांजा मिळून आला.

सदर इसमाविरोधात ट्रॉम्बे पोलीस ठाणेस कलम ८ (क), २० (ब), २९ अंमली पदार्थ विरोधी अधिनियम १९८५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून राहुल पिंटू शिंदे, वय २३ वर्षे, राठी.- देसाई गाव, पलावा सिटीजवळ शिळफाटा, कल्याण, ठाणे यास अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयात एकण ८ किलो १७६ ग्रॅम वजनाचा गांजा, किंमत अंदाजे, १,६०,०००/- रू., एक व्हॅगनार मोटार कार, किं.अ. ८,००,०००/- रू, एक ओप्पो कंपनीचा मोबाईल, किं.अं. ४,०००/- रू., व रू. ३,०००/- रोख रक्कम अशी मालमत्ता हस्तगत करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पूढील तपास सपोनि सुशिल लोंढे करीत आहेत.

सदरची उल्लेखनीय कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, मुंबई श्री महेश पाटील सो, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ६, मुंबई श्री. समीर शेख, सहायक पोलीस आयुक्त, ट्रॉम्बे विभाग, मुंबई श्री राजेश बाबशेट्टी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ट्रॉम्बे पोलीस ठाणे श्रीमती ऋता नेमलेकर यांचे मार्गदर्शनाखाली बंदोबस्त नेमणूकीवरील पोहक्र. ०६१३२५/पवार, नेमणूक ट्रॉम्बे पोलीस ठाणे, पोशिक्र. २१५०१७/ कोकरे, नेमणूक ल विभाग व एमएसएफ जवान होंबळे तसेच दहशतवाद विरोधी कक्षाचे सपोनि सुशिल लोंढे व पथक यांनी केली आहे.

------------------------------